

# श्री गोपाळकाला

– कै. सौ. सरस्वतीबाई जलतारे



# मनोगत

श्री गोपाळकाला या प्रस्तुत पुस्तकातील सर्व पदे माझ्या सासूबाई कै.सौ. सरस्वतीबाई जलतारे यांनी स्वतः रचली आहेत. ही सर्व पदे स्वरबध्द करुन आम्ही भगिनींनी म्हणजे '' जलतारे प्लॉट उपासना मंडळ, केशवराज भगिनि भजनी मंडळ आकोट, प. दा. अ. मंडळ भगिनी'' यांनी हा 'गोपाळकाला' कार्यक्रम जलतारे प्लॉट मधे प्रत्यक्ष सादर केला त्याच वेळी या कार्यक्रमाची व्हि.डी.ओ. कॅसेट पण काढली ही कॅसेट सर्व भगिनींनी पाहील्यानंतर त्याची ईच्छा अशी दिसली की सर्व पदे संग्रहीत केल्यास सर्वांनाच त्याचा लाभ घेता येईल म्हणुन या छोट्या पुस्तकाचे रुपाने ही पदे संग्रहीत केली आहे.

सासुबाई श्रीकृष्ण भक्त होत्या त्यामुळे त्यांचा हा भक्ती भाव प्रत्येक पदात पुरेपुर दिसून येतो. गोपाळकाला व त्याची कॅसेट त्यांचे हयातीत झाल्यामुळे त्यांनी कॅसेट पाहीली व त्यांना कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. त्यांचे मनातील ईच्छा पूर्ण केल्याचे समाधान आम्हाला मिळाले.

प्रस्तुत पुस्तकातील गोपाळकाला गाऊन सर्व भगिनींनी हा प्रसाद ग्रहण करावा हि ईच्छा.

॥ श्री गोपालकृष्ण भगवानकी जय ॥

१५ आक्टोबर २००२
( विजयादशमी)

– सौ. सुहासीनी जलतारे
जलतारे प्लॉट, आकोट

## १. गणपतीचे पद

आधी नमु श्री गणपतीला ॥धृ ॥
विघ्नहरा हे नामची साजे
कीर्ती ऐसी जगती गाजे,
तारी भक्तजना देवा ॥१ ॥ नमु श्री.

अष्टनायका ये विनायका
मुषकवाहना ये गजवदना
नमी कृष्णाबाला देवा ॥२॥

गजर - गजानना,गजानना ।
विघ्नांच्या करी कंदना ।

## २. सरस्वती पद

ये सरस्वती,नमन तुझ्या पदकमली ॥
तव ठायी बुध्दि रमली ॥धृ ॥

विश्वादिक चालक शक्ति
असशी बहु प्रेमळ मुर्ती ।
देवादिक तुजला नमिती ॥१॥

विद्येची स्वामीनी होसी,
थोर कवी तव गुण गाती,
स्तुति करीता रसना थकली ॥२॥

मयुरावरी बैसुनी आली,
सुमनानी पुजा केली,
भावभक्ती तुज अर्पियली ॥३॥

गजर - वीणाधारिणी स्फुर्तीदेवी,
सुमति आम्हा सत्वर द्यावी.

## ३. श्री नारायण गुरूचे पद

नारायण गुरु हरि, भजा हो नारायण गुरू हरि
निशीदिनी आठवण करते गुरूची।
सत्वर यावे हाकेसरशी ।
भवभय दुर करी ॥१॥ भजा हो नारायण.

करूणारव ऐकुनी यावे ।
भजनाया आशिष द्यावे ।
वंदन करी चरणी ॥२॥ भजा हो नारायण.

शरण मी आले कृष्णातनया,
प्रसन्न झाले श्री गुरूराया,
ईच्छा पुर्ण करी ॥३॥ भजा हो नारायण.

गजर – जय श्री शंकर गुरू भगवान
जय श्री नारायण सुखधाम ॥

## ४. देवजागृति

(आनंदाचा कंद हरी हा.)

क्षीरसागरी शेषावरती, निद्रा लागली जगपाला ॥धृ॥
लक्ष्मी जवळी लीन चरणी, करूणारव कानी आला ।
दुष्ट कंस हा फार मातला, छळीतो गोव्दिज भवताला ॥१॥

सुखर नभीचे एक मिळोनी, जागृत करीती देवाला ।
सुस्वर शब्दे गाई सरस्वती, जाग आली मग जगपाला ॥२॥

अभय देऊनी सर्व सुरांना, तुम्ही जावे स्वस्थाना।
देवकी उदरी जन्म घेऊनी, निर्दाळाया शत्रुला ॥३॥

आज्ञा वंदुनी शेष निघाला, रोहीणी गर्भी राहिला ।
माया आली नंदगृहाला, दुश्चिन्ह झाले कंसाला ॥४॥

विष्णुची ही अगाध लीला, गुप्त देव ये मथुरेला
गर्भस्तुतीला आरंभ केला, कंस महाली घाबरला ॥५॥

श्रावण वद्य,अष्टमी निशीला,चतुर्भुज प्रभु अवतरला
सत्वर न्या मज गोकुळाला,माया आणा मथुरेला ॥६॥

## ५. कृष्णजन्म

(आनंद कंद ऐसा)

वसुदेवदेवकीचा हरी गोकुळांत आला ॥
वसुदेव खिन्न झाला,हरी गोकुळांत आला ॥धृ॥
प्रभाती जागा आली

यशोदेस पुत्र झाला,नंदास मोद झाला ।
करी पुत्र उत्सवाला,हरी गोकुळांत आला ॥१॥

येती मिळूनी गौळणी,श्यामसुंदरा बघोनी ।
किती छान नंदलाल,भूषण गोकुळाला ॥२॥

गोप सांगे गौळणीला,शुभदिन आज आला ।
देव्हारी हार घाला,दही दुध ढेल घाला ॥३॥

गजर – हरि आला रे हरि आला रे
गोकुळी आनंद झाला रे ॥

## ६. औक्षवण

(माऊबिज माझे सदनी)

औक्षवण करिते आत्या,यशोदेच्या बाळा ।
सुवासिनी नटुनी आल्या,आल्या ब्रीजबाला ॥धृ॥

शुभ्र चांदीच्या तबकांत,निरांजन ज्योती ।
कुंकवाचा टिळा भाळी,अक्षतेला मोती ॥
रत्नजडीत अंगुठीने,हरीस ओवाळीला ॥१॥

तीळाचे ते तेल लावा,कोमल तनूला ।
उष्ण उदकी न्हाऊ घाला शामसुंदराला ॥
भरजरी अंगाटोपी,बाळलेणे ल्याला ॥२॥



Dr.vasudha deo govt. college of education

## ७. पाळणा

बाळा जो जो रे श्रीरंगा पुरवी अमुची तृष्णा बाळा जो जो रे
पाळणा सजविला, अनयानी, आल्या श्रीजकामिनी।
गोविंद घ्या कोणी, मुकुंदा, घ्या हो आनंदाला
बाळा जो जो रे, श्रीकृष्णा, पुरवी अमुची तृष्णा ॥धृ॥

आली यशोदा, सुंदरी, हाती मौक्तिक दोरी।
श्रीकृष्णा म्हणोनी, नामियला, पाळण्यांत झोपविला ॥जो

अंगाई गाते, राधिका, निज सख्या कुलदीपका।
क्षणभर विश्रांति, घे आता, वदली यशोमती माता ॥
बाळा जो जो रे ॥

## ८. भुपाळी

निशा संपली, दिशा खुलली
सुस्वर शब्दे, उठवी माऊली

उषा प्रभा ये रवि स्वागतासी
सुवासिनी मंगल गीत गाती ॥

## ९. गर्गमुनि

गोकुळी, गर्गमुनि आले, स्वागत नंदाने केले ॥धृ॥
आधी चरण वंदीले, आसनी ऋषीस बैसविले।

सांगे प्रभुचा वृत्तांत, जन्मा आला भगवंत ।
कोणते तप फळा आले, स्वागत नंदाने केले ॥१॥

धन्य यशोदा तु माय, अंकी खेळे यदुराय ।
भुषण होईल वंशाचे, स्वागत नंदाने केले ॥२॥

मन मोहिल गौळणींचे, वेड्या होतील वेणुनादे।
ऐसे वाक्य वेदाचे, स्वागत नंदाने केले ॥३॥

शासन करील दुष्टाते, मर्दील कपटी दैत्याते ।
शेवटी बलराम आले, स्वागत नंदाने केले ॥४॥

रक्षण करील भक्तांचे,सोडील राजे बंदीचे।
ऐसे भाग्य तुझे आले,स्वागत नंदाने केले ॥५॥

## १०. मामळभट

कपटी मामळभट ते आले,चंदन पाटावरी बैसले।
पंचांग हातावरी घेतले,पंचा खांद्यावरी ठेविले ॥
यशोदेला भविष्य सांगे,वाईट ग्रह ते तुझ्या मुलाचे।
नष्ट करील हा यदुवंशाते,अरिष्ट येईल गांवावरते ॥
चोरी करील गोकुळाप्रती,राधेवरती बहुतची प्रीती।
ऐकुनी दृष्टाची ती वाणी,यशोदेच्या नयणी पाणी ॥
धडधड गडगड आवाज आला,मामळभट तो मनी घाबरला।
कढई फसली डोक्यावरती, झारे सराटे धोपाड झोडती ॥
लाटणे मोगऱ्या पाठीत बसती,पाटचिकटला मांडीवरती।
पराल आदळे पोटावरती,गडवे प्याले आवाज करीती ॥
पंचा आवळे मानेभोवती,पुनःन येमी गोकुळासी।
यशोदे सती,जातो आता मथुरेसी ॥
गजर – कृष्ण कृष्ण जे पदारविंदे,गाती प्रेमे बालमुकुंदे ॥

## ११. कृष्ण सांगतो

(ओवीची चाल)

रुप सांवळ्या वाणाचे – बाळ खेळते नंदाचे
बाळ खेळते नंदाचे ॥धृ॥
खेळे अंगाणा ओसरी – आली राधिका दुसरी,
आली राधीका दुसरी
बलराम ये धांवत – संगे गोपाल नाचत
संगे गोपाल नाचत
कौतुक पाहे नंदराणी – आल्या मिळोन गौळणी
आल्या मिळोन गौळणी
धन्य नंदाचा हा वाडा– झाले आनंद केवढा
झाले आनंद केवढा

## १२. कृष्णाच्या खोड्या

असा कसा हा कृष्ण जन्मला गोकुळांत बाई
कृष्णाचा नट नाटकी यशोदे बाळ तुझा ग कान्हा ॥धृ॥

सार्‍या गोकुळामध्ये गं हा करितो धिंगाणा
काय करुमज काही सुचेना उपाय करु काही ॥१॥

रामी अमुच्या घरासी येवुनी दहीदुध हा खातो-
साय खावुनी लोणी सुनेच्या मुखासी पुसीतो ॥
घरण्या जाता हंसत हरी लपुनी हा जाई ॥२॥

शिंक्या वरती चढुनी बाई हात कसा पुरतो।
मांजर म्हणुनी शुक शुक करीता मजवरी गुरगुरतो
ताक दुल्याचे डेरे ओलांडुन पळुनी हा जाई ॥३॥

रात्री माझ्या घरासी आला भ्रतार शेजेला
मुषक सोडोनी दोघामध्ये हसत हा राही॥
आनंदाच्या गुज गोष्टीमध्ये कृष्ण कसा आला ॥४॥

## १३. मुरली-१

(युमुनातट शाम खेले होरी)

श्रीरंगा वाजवी मुरली मनमोहन
वाजवी मुरली-मनमोहन

स्वयंपाक मी करण्या बसले
श्रीयुत माझेप्रेम बोले
वाढ शिरा पोळी श्रीरंगा

यमुने तीरी मुरली वाजली-गोकुळी
माझ्या कानी पडली
तुशीच धावत आली श्रीरंगा

पाण्या जाता यमुनेतीरी घडा
तिथे विसरली ''मनमोहन''

## १४. मुरली- २

हरी रे तुझी मुरली मोहवी ।।धृ।। प्रभु

एक गोपी घाले वेणी,मस्तकी ती राहे फणी ।
भांबावल्या गौळणी,हरी रे तुझी ।।१।।

काजळ ते लावी हाता,हळदीने भांग भरिला ।
कुंकु लावे गळसरी,हरी रे तुझी ।।२।।

अग्रफुल कानामधे,नथ खोवी केसामधे ।
सरी आवळे कंबरी,हरी रे तुझी ।।३।।

धन्य गोपी लीन झाल्या,कृष्णचरणी लीन झाल्या ।
शुध्द भक्ती अर्पिली,हरी रे तुझी ।।४ ।।

## १५. दृष्ट

(चाल – प्रिय अमुचा एक)

माधवासी दृष्ट कशी आज जाहली ।
केशवासी दृष्ट कशी आज जाहली ।।धृ ।।

पाळण्यांत घालुनीया हलविते जरी
भलभलते उंगीच पहा शब्द तै धरी
गीत गात समजविते,समजेना हरी ।।१।।

राधेगृही जातांना जाऊनीया दृष्ट जाहली ।
गाईगोठ्या जाऊनीया पुच्छ ते धरी,
सांगुनी मी थकले हो,ऐकेना हरी ।।२।।

देवीची ओटी भरीन मोहरा मोत्यांनी ।
खणानारळ हिरवा चुडा साडी भरजरी,
अंगारा लावी राधा,हसला श्रीहरी ।।३।।

## १६. शिदोरी

शिदोरी बांधुन दे ग आई , सवंगडी मज बाहती ॥धृ ॥
शुध्द सत्वगुणी कपड्यामधे,
पान केळीचे ठेवुनी शिदोरी ॥धृ ॥
रजोगुणाची पुरणपोळी,घृत भरपुर घालीसी ॥१॥
खाजी करंजी,छान सांजोरी,मात केशरी शिरापुरी ॥२॥
तमोगुणाचे भजे वडे ते ,तिखट घालुनी डाळ करी।
चकली कचोरी शेव बरफी,हिरवी मिरचीचा ठेचा करी ॥३॥
शिदोरी बांधी यशोदा आई,श्रीहरी नेई वनांतरी।
वनमोजनी मजा करोनी,तृप्त झाले सवंगडी ॥४ ॥

## १७. काला-१

यमुनेच्या तीरी हरि काला करतो
गोप सवंगड्यासवे खेळतो,यमुनेच्या तीरी ॥
पोहो मुरमुरे डाळ भिजविली,
हिरवी मिरची वरी कोथिंबिरी
लिंबाचे लोणचे मिसळीतो ॥१॥
ताक लोणचे करवंदाचे,
आवळा रायते बटाट्याचे
पेरू आंबे केळी मिळवितो ॥२॥
दही दुध लोणी साखर घाली,
आली राधिका चतुरशहाणी।
पैंजणाचा नाद घुमवितो ॥३॥
ऐसा करुनी सुंदर काला,
सर्वांना आनंद झाला।
प्रसाद मागे कृष्णाबाला,
प्रेमाने सुखी कवळ देतो ॥४ ॥

## १८. काला-२

चला जावु यमनेकाठी पाहू जगजेठी
वाटीतो ग काला मुले करीताती दाटी ॥धृ ॥
नभी आले सुखर विमानांची दाटी
जमल्यात गोपी तीथे राधा आहे फार हट्टी ॥१॥
जमल्यात देव ललना लाह्या पुष्पे हाती
हर्ष मनी फार झाला पाहू जगजेठी ॥२॥
मोरमुकुट पितांबर चंदनाची उटी
सुमनानी पुजा केली हार घालु कंठी ॥३॥
दृष्टन हो माधवाला तीट लावा गाली।
मंजीरीची आवड मोठी बुक्का लावू भाळी ॥४॥
गोपाळ काला गोड झाला. कृष्णा हस्ते खावु चला

## १९. आरती

(रूसु नको कृष्णा)

जय जय श्रीकृष्ण आनंद कंदा
ओवाळु आरती बाल मुकुंदा ॥धृ ॥
कारागृहामध्ये जन्माला आला।
गोकुळामध्ये करी बाल लीला।
राधा रमणी हरी गोविंदा ॥१॥
गौळणीच्या घरी अवचित जाशी।
शिक्यावरचे दही लोणी खाशी॥
वेणु नांदे क्रिडा करीशी ॥२॥
भक्त जनाचा कैवारी होशी।
संकट समयी धावुनी ये सी ॥
योगी मुनींना दर्शन देसी ॥३॥
प्रार्थना करीते तुम्ही कृष्णाबाला ।
भारतामध्ये ये नंदलाला ॥
आनंदी आनंद करी जगपाला ॥४॥

***

## २०. भैरवी

श्रीकृष्ण श्रीपते निज सदयते नी जगपते ॥धृ ॥
भक्तास्तव दिनरात्री कष्टलासी तु जगजेठी ।
घे घडीभर विश्रांती आंस आमुची नीज सदयते ॥१॥
रजनी शांत नीज निवांत झोप त्वरे नंदलाल ।
प्रेमाची घेई शाल पहुड बा इथे ॥२॥
गाते यशोदाई माला नीजसख्या कृष्ण नाथा ।
नित्य वदे कृष्णा लाला, ऐक इतुके-नीजसदयते ॥

## २१. विनंती

अल्पमतीने केली सेवा
गोड करूनी घ्यावी ।
शांती सुखाची जोड देवा
सदा असु द्यावी -

कवियत्री
**कै. सौ. सरस्वतीबाई जलतारे**
जलतारे प्लॉट, आकोट